# शासकीयअभियांत्रिकीमहाविद्यालय,कराड

फोननं.(०२१६४) २७१७११, २७२४१४, २७२४१५ फॅक्सनं.(०२१६४) २७१७१३

संकेतस्थळ : http://gcekarad.ac.in

Email: principal@gcekarad.ac.in


जा.क्र.शाअमक/विवि/प्रवेश /२०१७-१८/300 दिनांक : 05/06/2017

**परिपत्रक :**

**विषय :शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता द्वितीय वर्ष ते चतुर्थ वर्षाचे प्रवेश निश्चित करणेबाबत. बीटेक/एमसीए/एमटेक अभ्यासक्रमाकरीता.**

उपरोक्त विषयानूसार सर्व विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता द्वितीय वर्ष ते चतुर्थ वर्ष सर्व अभ्यासक्रमाचे प्रवेश हे ऑनलाईन पध्दतीने फी भरुन निश्चित करावयाचे आहेत. त्याबाबतची सर्व माहिती आपल्या संस्थेच्या वेबसाईट वर उपलब्ध करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी खालील निर्देशित केलेल्या दिनांकास आपला प्रवेश अर्ज भरुन आवश्यक त्या कागदपत्रासह विद्यार्थी विभागातून तपासून, प्रवेश शुल्क निश्चित करुन घ्यावे व ऑनलाईन पध्दतीने प्रवेश शुल्क भरावे.तसेच भरलेल्या शुल्काची पावती जनरेट करुन सदर पावतीच्या छायाप्रतीसह प्रवेश अर्ज विद्यार्थी विभागात जमा करावयाचा आहे.

प्रवेशाचे अर्ज विद्यार्थी ग्राहक भांडारातउपलब्ध आहेत.

| अ.क्र. | वर्ग व शाखा | दिनांक |
|---|---|---|
| १. | बी-टेक अभ्यासक्रमद्वितीय वर्ष सर्व शाखा | ०३/०७/२०१७ स.१०.३० ते ०१.३०<br>दु.०२.३० ते ०४.०० |
| २. | बी-टेक अभ्यासक्रमतृतीय वर्ष सर्व शाखा | ०४/०७/२०१७ स.१०.३० ते ०१.३०<br>दु.०२.३० ते ०४.०० |
| ३. | एमसीए अभ्यासक्रमद्वितीय व तृतीय वर्ष<br>एम-टेक अभ्यासक्रमद्वितीय वर्षसर्व शाखा | ०५/०७/२०१७ स.१०.३० ते ०१.३०<br>दु.०२.३० ते ०४.०० |
| ४. | बीई अभ्यासक्रमचतर्थ वर्ष सर्व शाखा<br>**प्रोव्हीजनल ॲडमिशन** | २९/०६/२०१७ ते ३०/०६/२०१७<br>संबंधित विभागामध्ये रु.५०० भरुन प्रवेश निश्चित करावयाचा आहे. |

अंतिम (चतुर्थ ) वर्षातील सर्व विद्यार्थ्यांनी उपरोक्त दिनांकास प्रोव्हीजनल प्रवेश घेवून, विद्यापिठाचा निकाल लागले नंतर, विद्यार्थी विभागातून आवश्यक त्या कागदपत्रासह अर्ज तपासून, पूर्ण शुल्क भरुन प्रवेश घ्यावयाचा आहे. विद्यापिठाचा निकाल लागलेनंतर ज विद्यार्थी अंतिम वर्षात प्रवेश घेवू शकणार नाहीत, त्या सर्व विद्यार्थ्यांचे तात्पुरते भरणेत आलेले शुल्क संबंधित विद्यार्थ्यास परत करण्यात येईल. तरी सर्व विद्यार्थ्यांनी उपरोक्त दिनांकास संस्थेत उपस्थित राहून आपला प्रवेश निश्चीत करुन घ्यावा.

डिन ॲकेडेमिक,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

प्रत : सर्व विभागप्रमुखांना माहिती व आवश्यकत्या कार्यवाहीसाठी.

२/- त्यांना कळविणेत येतेकी, अंतिम वर्षातील सर्व विद्यार्थ्यांचे प्रोव्हीजनल ॲडमिशन आपल्या विभागांतर्गत करावयाचे असून, जे विद्यार्थी प्रोव्हीजनल ॲडमिशन घेणार नाहीत, त्यांची नांवे डिन ॲकेडेमिक विभागाकडे कळविण्यात यावीत.

प्रत : सर्व नोटिस बोर्डावर विद्यार्थ्यांचे माहितीसाठी.

प्रत: मा. प्राचार्य, शासकीय अभि.महाविद्यालय कराड यांना माहितीसाठी सादर.